खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

## स्व. साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतीदिन कार्यक्रम



प्रभात

# साहेबराव बुट्टेपाटील हे शिक्षणक्रांतीचे जनक

**हभप प्राजक्ता झेंडे यांचे प्रतिपादन**



**राजगुरुनगर, दि. ३ (प्रतिनिधी)** - माजी आमदार व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय साहेबराव बुट्टेपाटील यांच्या दूरदृष्टीमुळे सुमारे ५० वर्षांपूर्वी खेड तालुक्यात हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या रूपाने शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. यातून ज्ञानगंगा तालुक्यातील खेडोपाडी पोहोचली. त्यामुळे साहेबराव बुट्टे पाटील हे खेड तालुक्यातील शिक्षणक्रांतीचे खरे जनक असल्याचे प्रतिपादन हभप प्राजक्ता झेंडे यांनी केले.

(स्व) साहेबराव बुट्टेपाटील यांच्या २५ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, राष्ट्रवादीच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, बळवंत डांगले, सुरेश टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक नारायण शिंदे विद्यार्थी उपस्थित होते.

हभप प्राजक्ता झेंडे यांनी साहेबराव बुट्टेपाटील यांच्या जीवनकार्याचा गौरव केला. त्यांचे व्यक्तिमत्त्व संवेदनशील, समाजशील व त्यागी होते. राजकारणात मोठ्या संधी असतानाही त्यांनी पद व प्रतिष्ठेचा मोह टाळून शिक्षणासारख्या आवडीच्या क्षेत्रात अखंडपणे कार्य केले. त्यांचे हे कार्य त्यांचे सुपुत्र ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील तितक्याच निष्ठेने पुढे नेत असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी तनिष्का शेलार व साक्षी शिवेकर यांनी मनोगत व्यक्त केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने क्रीडाज्योत व एनसीसी पथकाकडून मानवंदना, सर्वधर्मीय प्रार्थना, विज्ञान प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, हस्ताक्षर स्पर्धा, भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजुषा तसेच सरस्वती पूत्र या भित्तीपत्रकाचे अनावरण केले.

साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या वतीने फर्मे टोपिया, अन्नधान्य प्रदर्शन, रक्तगट व रक्तदाब तपासणी उपक्रम राबविले. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिरात ९१ जणांनी रक्तदान केले. पुणे येथील ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधीक्षक अरुण बर्डे, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. अक्षय पाटील, डॉ. पायल मुळे व डॉ. अंजली कनावर यांनी सहकार्य केले. यावेळी वसुंधरा संवर्धनाची शपथ घेतली. सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी केले.

Pune Gramin Edition
Jan 04, 2026 Page No. 8
Powered by: erelego.com

सकाळ

# खेडला साहेबराव बुट्टे पाटील यांच्यामुळे शिक्षणक्रांती : प्राजक्ता झेंडे



**राजगुरुनगर** : स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित रक्तदान शिबिरातील रक्तदात्यांना प्राचार्य, उपप्राचार्य व मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे देण्यात आली.

**राजगुरुनगर, ता. ६** : "माजी आमदार व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांनी ५० वर्षांपूर्वी खेड तालुक्यात हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या रूपाने महाविद्यालयीन शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवल्यामुळे ज्ञानगंगा तालुक्याच्या खेडोपाडी पोचली. त्यामुळे साहेबराव बुट्टे पाटील हे खेड तालुक्यातील शिक्षणक्रांतीचे जनक आहेत," असल्याचे प्रतिपादन कीर्तनकार प्राजक्ता झेंडे यांनी केले.

त्या साहेबराव बुट्टेपाटील यांच्या २५ व्या स्मृतिदिनानिमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित अभिवादन कार्यक्रमात बोलत होत्या.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, राष्ट्रवादीच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, बळवंत डांगले, सुरेश टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक नारायण शिंदे आदी उपस्थित होते. याप्रसंगी तनिष्का शेलार व साक्षी शिवेकर या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. स्मृतिदिनानिमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्यावतीने क्रीडाज्योत, एनसीसी पथकाकडून मानवंदना, सर्वधर्मीय प्रार्थना, विज्ञान प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, हस्ताक्षर स्पर्धा, भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा, सरस्वती पूत्र या भित्तिपत्रकाचे अनावरण आदी उपक्रम घेण्यात आले.

रक्तदान शिबिरात ९१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. याप्रसंगी वसुंधरा संवर्धनाची शपथ घेण्यात आली. प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी सूत्रसंचालन केले.

Pune, District-Today
07/01/2026 Page No. 4

पुढारी

# साहेबराव बुट्टे पाटील यांच्यामुळे शिक्षणक्रांती : ह.भ.प. प्राजक्ता झेंडे

**खेड : पुढारी वृत्तसेवा**

**माजी आमदार व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष साहेबराव बुट्टे पाटील यांच्यामुळे ५० वर्षांपूर्वी खेड तालुक्यात हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या रूपाने शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. ज्ञानगंगा तालुक्याच्या खेडोपाडी पोहचली. साहेबराव बुट्टेपाटील हे खेड तालुक्यातील शिक्षणक्रांतीचे जनक असल्याचे प्रतिपादन ह.भ.प. प्राजक्ता झेंडे यांनी केले.**

साहेबराव बुट्टेपाटील यांच्या २५ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, राष्ट्रवादीच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टे पाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, बळवंत डांगले, सुरेश टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही.बी. दौंडकर, प्रबंधक नारायण शिंदे आदी उपस्थित होते.

## २५ व्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

झेंडे यांनी साहेबराव बुट्टेपाटील यांच्या कर्तृत्वाला उजाळा दिला. राजकारणात संधी असतानाही त्यांनी राजकीय पद व प्रतिष्ठेचा त्याग केला. शिक्षणासारख्या आवडीच्या क्षेत्रात काम करत राहिले. त्यांचे कार्य त्यांचे पुत्र देवेंद्र बुट्टे पाटील तितक्याच निष्ठेने पुढे घेऊन जात आहेत असे त्या म्हणाल्या.

या प्रसंगी तनिष्का शेलार, साक्षी शिवेकर या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले.



साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृतीदिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करताना राजमाला बुट्टे पाटील.

स्मृतिदिनानिमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने क्रीडाज्योत, एनसीसी पथकाकडून मानवंदना, सर्वधर्मीय प्रार्थना, विज्ञान प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, हस्ताक्षर स्पर्धा, भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजुषा, सरस्वती पुत्र या भीत्तिपत्रकाचे अनावरण आदी उपक्रम तर साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयाच्या वतीने फर्मेंटोपिया, अन्नधान्य प्रदर्शन व रक्तगट आणि रक्तदाब उपक्रमांचे आयोजन करण्यात आले

राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात ९१ जणांनी रक्तदान केले. ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधीक्षक अरुण बर्डे, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. अक्षय पाटील, डॉ. पायल मुळे, डॉ. अंजली कनावर यांनी शिबिरास सहकार्य केले. सूत्रसंचालन प्रा. धनंजय बो-हाडे यांनी केले.

My Pune Gramin Edition
Jan 06, 2026 Page No. 2
Powered by: erelego.com

दैनिक आरंभपर्व
05 Jan 2026 - Page 2

# साहेबराव बुट्टे पाटील यांच्यामुळे शिक्षणक्रांती - ह. भ. प. प्राजक्ता झेंडे

**किरण खुडे**



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

माजी आमदार व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष साहेबराव बुट्टेपाटील यांच्यामुळे ५० वर्षांपूर्वी खेड तालुक्यात हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या रूपाने शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि ज्ञानगंगा तालुक्याच्या खेडोपाडी पोचली. त्यामुळे साहेबराव बुट्टेपाटील हे खेड तालुक्यातील शिक्षणक्रांतीचे जनक असल्याचे प्रतिपादन ह.भ.प. प्राजक्ता झेंडे यांनी केले. त्या साहेबराव बुट्टेपाटील यांच्या २५ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, राष्ट्रवादीच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, बळवंत डांगले, सुरेश टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही.बी. दौंडकर, प्रबंधक नारायण शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

ह.भ.प. प्राजक्ता झेंडे यांनी बोलताना साहेबराव बुट्टेपाटील यांच्या जीवन कर्तृत्वाला उजाळा दिला. त्यांचे व्यक्तिमत्व संवेदनशील, समाजशील व त्यागी होते. राजकारणात संधी असतानाही त्यांनी राजकीय पद व प्रतिष्ठेचा त्याग केला. शिक्षणासारख्या आवडीच्या क्षेत्रात काम करत राहिले. त्यांचे कार्य त्यांचे सुपुत्र देवेंद्र बुट्टे पाटील तितक्याच निष्ठेने पुढे घेऊन जात असल्याचे त्या म्हणाल्या.

या प्रसंगी कु. तनिष्का शेलार, कु. साक्षी शिवेकर या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. स्मृतिदिनानिमित्त हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या वतीने क्रीडाज्योत, एनसीसी पथकाकडून मानवंदना, सर्वधर्मीय प्रार्थना, विज्ञान प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, हस्ताक्षर स्पर्धा, भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजुषा, सरस्वती पुत्र या भीत्तिपत्रकाचे अनावरण आदी उपक्रम तर साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयाच्या वतीने फर्मेंटोपिया, अन्नधान्य प्रदर्शन व रक्तगट आणि रक्तदाब तपासणी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले

राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात ९१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. पुण्याच्या ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधीक्षक अरूण बर्डे, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. अक्षय पाटील, डॉ. पायल मुळे, डॉ. अंजली कनावर सहभागी झाले. याप्रसंगी वसुंधरा संवर्धनाची शपथ घेण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी केले.

लोकमत



साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना ॲड. राजमाला बुट्टेपाटील.

# बुट्टेपाटील यांच्यामुळेच झाली शिक्षणक्रांती : प्राजक्ता झेंडे

## साहेबराव बुट्टे पाटील यांच्या २५ व्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** माजी आमदार आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष साहेबराव बुट्टेपाटील यांच्या प्रयत्नांमुळे ५० वर्षांपूर्वी खेड तालुक्यात हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या स्थापनेद्वारे शिक्षणाची पायाभरणी झाली आणि ज्ञानाचा प्रवाह तालुक्याच्या ग्रामीण भागात पोहोचला. त्यामुळे साहेबराव बुट्टेपाटील हे खेड तालुक्यातील शिक्षण क्रांतीचे जनक असल्याचे प्रतिपादन ह्भप प्राजक्ता झेंडे यांनी केले. त्या साहेबराव बुट्टे पाटील यांच्या २५ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात बोलत होत्या.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, राष्ट्रवादीच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टे पाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, बळवंत डांगले, सुरेश टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही.बी. दौंडकर, प्रबंधक नारायण शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

ह्भप प्राजक्ता झेंडे यांनी साहेबराव बुट्टेपाटील यांच्या जीवन कार्याला उजाळा दिला, ज्यात त्यांनी राजकारणात संधी असतानाही राजकीय पद आणि प्रतिष्ठेचा त्याग केला आणि शिक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत राहिले. त्यांच्या कार्याची धुरा त्यांचे सुपुत्र देवेंद्र बुट्टेपाटील तितक्याच निष्ठेने पुढे नेत आहेत, असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी तनिष्का शेलार आणि साक्षी शिवेकर या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. स्मृतिदिनानिमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले, ज्यात क्रीडाज्योत, एनसीसी पथकाकडून मानवंदना, सर्वधर्मीय प्रार्थना, विज्ञान प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, हस्ताक्षर स्पर्धा, भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजूषा, सरस्वती पुत्र या भित्तिपत्रकाचे अनावरण आणि साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात फर्मेंटोपिया, अन्नधान्य प्रदर्शन, रक्तगट आणि रक्तदाब तपासणीचे आयोजन करण्यात आले.

**राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने शिबिरात ९१ रक्तदात्यांनी रक्तदान केले**

पुण्याच्या ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधीक्षक अरूण बर्डे, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. अक्षय पाटील, डॉ. पायल मुळे, डॉ. अंजली कनावर सहभागी झाले. सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी केले.

Hello Pune Gramin
Page No. 3 Jan 05, 2026
Powered by: erelego.com

केसरी

किरण खुडे (पत्रकार)

# साहेबराव बुट्टेपाटील यांच्यामुळे शिक्षणक्रांती : झेंडे

**राजगुरुनगर,**(वार्ताहर) : माजी आमदार व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष साहेबराव बुट्टेपाटील यांच्यामुळे ५० वर्षांपूर्वी खेड तालुक्यात हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या रूपाने शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि ज्ञानगंगा तालुक्याच्या खेडोपाडी पोचली. त्यामुळे साहेबराव बुट्टेपाटील हे खेड तालुक्यातील शिक्षणक्रांतीचे जनक असल्याचे प्रतिपादन प्राजक्ता झेंडे यांनी केले.



साहेबराव बुट्टेपाटील यांच्या २५ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. याप्रसंगी संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, राष्ट्रवादीच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा राजमाला बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, बळवंत डांगले, सुरेश टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही.बी. दौंडकर, नारायण शिंदे उपस्थित होते.

झेंडे यांनी बोलताना साहेबराव बुट्टेपाटील यांच्या जीवन कर्तृत्वाला उजाळा दिला. त्यांचे व्यक्तिमत्त्व संवेदनशील, समाजशील व त्यागी होते. राजकारणात संधी असतानाही त्यांनी राजकीय पद व प्रतिष्ठेचा त्याग केला. शिक्षणासारख्या आवडीच्या क्षेत्रात काम करत राहिले. त्यांचे कार्य त्यांचे सुपूत्र देवेंद्र बुट्टे पाटील तितक्याच निष्ठेने पुढे घेऊन जात असल्याचे त्या म्हणाल्या.

या प्रसंगी तनिष्का शेलार, साक्षी शिवेकर या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. स्मृतिदिनानिमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने क्रीडाज्योत, एनसीसी पथकाकडून मानवंदना, सर्वधर्मीय प्रार्थना, विज्ञान प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, हस्ताक्षर स्पर्धा, भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजुषा, सरस्वती पूत्र या भीतिपत्रकाचे अनावरण आदी उपक्रम तर साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयाच्या वतीने अन्नधान्य प्रदर्शन व रक्तगट आणि रक्तदाब तपासणी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले

राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात ९१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. पुण्याच्या ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधीक्षक अरूण बढे, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. अक्षय पाटील, डॉ. पायल मुळे, डॉ. अंजली कनावर सहभागी झाले. याप्रसंगी वसुंधरा संवर्धनाची शपथ घेण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख